सांज दैनिक
आपलं मन

# राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलमध्ये 'पोलीस-विद्यार्थी संवाद' उपक्रम

## बाबांच्या डोक्यावर हेल्मेट दिसत नाही तो पर्यंत बाय-टाटा म्हणू नका-लातूर पोलिसांचे चिमुकल्यांना भावनिक आवाहन

**भैरवनाथ पाटील यांच्याकडून**

लातूर : विद्यार्थ्यांमध्ये वाहतूक नियम, सायबर सुरक्षा आणि डिजिटल माध्यमांच्या सुरक्षित वापर, नशामुक्ती विषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलमध्ये 'पोलीस-विद्यार्थी संवाद' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक श्री. भालचंद्र तिडके उपस्थित होते. त्यांचे स्वागत शाळेचे प्राचार्य कर्नल एस. श्रीनिवासुलु यांनी शाल, पुष्पगुच्छ व ग्रंथ भेट देऊन केले.

यावेळी पोलीस उपनिरीक्षक भालचंद्र तिडके यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना वाहतूक नियमांचे पालन, हेल्मेटचा वापर, सीटबेल्टचे महत्त्व, मोबाईल व सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर, सायबर क्राईम, ऑनलाइन गेम्स, अनोळखी लिंकपासून सावध राहणे तसेच आपत्कालीन परिस्थितीत वापरता येणाऱ्या ११२ या आपत्कालीन क्रमांकाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी सुरक्षितता आणि जबाबदार नागरिकत्वाची जाणीव ठेवावी, असे आवाहन त्यांनी केले. तसेच त्यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विद्यालयाच्या वतीने होत असलेल्या सर्वांगीण उपक्रमांचे कौतुक करीत समाजभान जपणारे उद्याचे देशभक्त नागरिक या विद्यालयातून निश्चित घडतील असा विश्वास श्री तिडके यांनी व्यक्त केला.

RNLES

लातूरचे पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली लातूर शहरात विद्यार्थ्यांमध्ये पोलीस विभागाशी संवाद वाढविण्यासाठी आणि विविध सामाजिक विषयांबाबत जनजागृती करण्यासाठी अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. यावेळी शाळेच्या संगणक विभाग प्रमुख तहसीन शेख यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा या विषयावर मार्गदर्शन केले.

याचसोबत क्लिक हिल फाऊंडेशन व पोलिस महासंचालनालय यांच्या संयुक्त विद्यमाने होत असलेल्या सायबर सुरक्षा प्रशिक्षण विद्यालयात संपन्न झाले. यावेळी स्वयंसेवक विद्यार्थी साहिल जाधव व परमेश्वर पाटील यांनी इंटरनेटचा सुरक्षित वापर, वैयक्तिक माहितीची गोपनीयता आणि ऑनलाइन व्यवहारांमध्ये घ्यावयाची काळजी याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण माहिती दिली.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना कायदा, वाहतूक शिस्त आणि डिजिटल सुरक्षेबाबत उपयुक्त माहिती मिळाली. यावेळी रजिस्ट्रार प्रवीण शिवणगीकर,उपप्राचार्य रिना नायर, प्राथमिक विभागप्रमुख अरुल सेल्वी, पर्यवेक्षक बी के भालेराव, सर्व शिक्षकवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते.